'A' Grade
NAAC Re-accredited
(4th Cycle)

॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

## जनसंपर्क विभाग

जळगाव दि. १२ (प्रतिनिधी) : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजना एककांमध्ये हर घर तिरंगा अभियान-२०२५ राबविण्यात येते आहे. या अंतर्गत तिरंगा रॅलीसह विविध उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

विद्यापीठासह संलग्नित महाविद्यालयांमध्ये दि. ०२ ते १५ ऑगस्ट, २०२५ या कालावधीत राष्ट्रीय सेवा योजना एककांमध्ये हर घर तिरंगा अभियान-२०२५ राबविण्यात येते आहे. दि.१३ ते १५ ऑगस्ट, २०२५ दरम्यान तिरंगा रॅली, मशाल रैली, तिरंगा मानवी साखळीचे आयोजन, तिरंगा महोत्सव, तिरंगा सोबत सेल्फी, रांगोळी स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा, भित्तीपत्रक स्पर्धा, प्रश्न मंजूषा इ. उपक्रमाचे आयोजन महाविद्यालय स्तरावर करण्यात येत आहे.

तसेच राष्ट्रीय सेवा योजना एककांनी दत्तक गावात नागरिकांमध्ये स्वंयसेवकांच्या मदतीने तिरंगा जनजागृती, तिरंगा खरेदी करण्यासाठी व दि.१३ ते १५ ऑगस्ट, २०२५ दरम्यान आपआपल्या घरावर तिरंगा फडकविण्याकरीता आवाहन करणार आहेत. राष्ट्रीय सेवा योजना कक्षाच्या वतीने विद्यापीठामध्ये दि.१३ ते १५ ऑगस्ट, २०२५ दरम्यान मुख्य प्रशासकीय ईमारतीवर राष्ट्रीय ध्वज फडकविण्यात येणार असुन दि. १५ ऑगस्ट, २०२५ रोजी तिरंगा रॅली व तिरंगा मानवी साखळीचे आयोजन करण्यात आलेले आहे. प्रशासकीय भवन मुख्य प्रवेशब्दार येथे विद्युत रोषनाई करण्यात येणार असल्याची माहिती राष्ट्रीय सेवा योजनेचे संचालक डॉ. सचिन नांद्रे यांनी दिली आहे

.........................................................................................................................................

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२५ दिनांक: १२ ऑगस्ट, २०२५

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

कृपया, उपरोक्त बातमीस आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

जनसंपर्क अधिकारी करीता